**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य सेवा**
**वैद्यकिय अधिक्षक,वर्ग-१ ग्रामीण रुग्णालय, देवरुख**
**ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी. पिन- ४१५८०४**

**दूरध्वनी क्रमांक:- ०२३५४-२६१०९३-२६००४०** | **e-mail- rh.devrukh@gmail.com**

**जा. क्र./ग्रारुदे/आस्था/ /1736/2026,** **दिनांक:- 21/09/2026**

**आरोग्य सेवा.**

दरपत्रक सूचना

विषय- सन २०२६-२७ ग्रामीण रुग्णालय देवरुख ता.संगमेश्वर जि. रत्नागिरी करिता आयुर्वेदिक औषधांची स्थानिक खरेदी करण्याबाबत.

सूचित करण्यात येते की, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय देवरुख ता.संगमेश्वर जि. रत्नागिरी कार्यालयामार्फत सन २०२६-२७ मध्ये सोबत जोडलेल्या यादीतील बाबींची खरेदी करणे कामी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. त्या करिता सोबत जोडलेल्या यादीत औषधांची नावे निश्चित केली आहे. यासाठी स्थानिक पातळीवरून स्थानिक ठेकेदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक मागविण्यात येत आहे. इच्छुकांनी दरपत्रक सादर करावे.
तरी सोबत जोडलेल्या यादीनुसार आपले बाजार भावाचे (सर्व करासहित) दरपत्रक या कार्यालयाकडे दिनांक ३०-०९-२०२६ रोजी सायं. ०४:०० वाजेपर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावे.
लिफाफा १ (तांत्रिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे-
१) अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Drug Licences)
२) शॉप ॲक्ट लायसन्स / व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत.
३) जीएसटी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत किंवा प्रमाणपत्र नसल्यास लेखापरीक्षक (CA) यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.
४) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत
लिफाफा २ (आर्थिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे-
१) लिफाफा २ मध्ये सिलबंद दरपत्रक सादर करावे.
दरपत्रक सादर करण्याच्या सर्वसाधारण अटी व शर्ती-
१. इच्छुकांनी वरील लागणारे औषधे वर स्वतंत्र दरपत्रक सिलबंद लिफाफा मध्ये सादर करावीत. प्रत्येक फर्मला एक एक दरपत्रक देण्याची परवानगी आहे. तसेच दरपत्रक Authorized Distributors Manufacturers, Wholesale Suppliers यांनी भरावयाची आहेत.
२. दरपत्रकासोबत अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र (Drug Licences) सोबत जोडणे आवश्यक.
३. जी.एस.टी नं व पॅनकार्ड
४. संस्था / दुकान उपकरणे उत्पादन / विक्रीविषयक नोंदणी दाखला
५. दरपत्रके पोहोच करण्याचे ठिकाण वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय देवरुख ता.संगमेश्वर कार्यालयात कामकाजाच्या वेळेत (सुट्टीवगळता) दि. ३०-०९-२०२६ (४.०० वाजेपर्यंत)
७. यादी मधील बाबी आवश्यकता प्रमाणे खरेदी केली जातील.

८. औषधांची खरेदी अत्यावश्यक असल्याने तात्काळ १५ दिवसात पुरवठा करणे बंधनकारक राहील. मुदतीनंतर पुरवठा केल्यास प्रति आठवडा ०.५ टक्के वसुली करण्यात येईल.

९. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर पुरवठा केलेल्या मालाच्या बिलामध्ये आपला Drug Licence no पॅनकार्ड व जी. एस. टी नं. नमूद करावा. तसेच आकार, वजनप्रमाणे इ. तसेच नियमानुसार जे शासकीय कर लागू असतील ते सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

१०. मंजूर दरपत्रकामधील बाबींचा पुरवठा करणे आपणास शक्य झाले नाही व त्यामुळे वाढीव दराने बाहेरून खरेदी करावी लागली तर निविदेतील मंजूर दर व वाढीव दर या मधील फरकाची रक्कम आपल्याकडून वसूल करण्यात येईल.

११. सदर दरपत्रकामधील बाबींचा पुरवठा हा हॉस्पिटलमध्ये आपण पोहोच करावा.

१२. सोबत जोडलेल्या यादीतील आपण पुरवठा करावयाचा औषधांचे  दर देणे बंधनकारक आहे. तसेच दर MRP / DPCU पेक्षा जास्त असून नये तसेच औषधे व साहित्याबाबत राज्य शासन / केंद्र शासनाचे सर्व शासननिर्णय व परिपत्रके पालन करण्याची सर्व जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.

१३. औषधे / साधनसामुग्री / डिस्पोजेबल बाबतीत आवश्यकतेची मात्रा मागणीनुसार खरेदी करण्यात येईल. सर्व बाबी यादीनुसार खरेदी करणे या कार्यालयावर बंधनकारक नाही.

१४. एखादे औषध / साधनसामुग्री / डिस्पोजेबल अप्रमाणित अथवा खराब आढळल्यास त्या विषयी होणारी सर्व शासकीय कार्यवाहीची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील. नवीन बदली करून द्यावे लागल्यास तो पुरवठा विना शर्त व इतर खर्चाची भरपाई करणे हे दरपत्रकधारकास बंधनकारक राहील.

१५. यादीमध्ये नमूद करण्यात आलेली औषधे / साधनसामुग्री / डिस्पोजेबल हे मागणीनुसार त्वरित पुरवठा करण्यात यावीत. १ वर्षापेक्षा कमी प्रमाणावरील साहित्य पुरवठा करू नये.

१६. निश्चित केलेल्या दरामध्ये देयके तीन प्रति ७ दिवस मध्ये सादर करावीत.

१७. पुरवठा केलेल्या औषधांचे देयक अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदा केले जाईल.

१८. सदर औषधे / साधनसामुग्री / डिस्पोजेबल हे अत्यावश्यक सेवेसाठी लागणारी असून या रुग्णालयाने मागणी करताच तात्काळ पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

१९. दरपत्रके स्वीकारण्याची मुदत नोटीस प्रसिद्धी दिनांकापासून दि. ३०/०९/२०२६ (४.०० वाजेपर्यंत) नंतर उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२०. दरपत्रके उघडण्याची तारीख दि. ०१/१०/२०२६ (स. १०.०० वा.) किंवा या कार्यालयाकडून नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.

२१. कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा प्रक्रिया स्थगित ठेवण्याचा अधिकार वैद्यकीय अधीक्षक,  ग्रामीण रुग्णालय देवरुख ता.संगमेश्वर रत्नागिरी यांना राखून ठेवला आहे. तसेच कोणतीही तोंडी अथवा वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय देवरुख ता. संगमेश्वर रत्नागिरी यांनी कारण दिले जाणार नाही. दरपत्रकाचा कालावधी ०७ महिने ३१ मार्च २०२७ पर्यंत असेल.

आदेशानुसार

Medical Superintendand CL-I
Rural Hospital, Deorukh

वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय देवरुख ता.संगमेश्वर
जि. रत्नागिरी

**कार्यालयाचा पत्ता-**

वैद्यकीय अधीक्षक,ग्रामीण रुग्णालय देवरुख
यांचे कार्यालय,

प्रत: १) नोटीस बोर्ड   २) शासन संकेत स्थळ

# औषधांची यादी

| अ. क्र | औषधांची नावे |
|---|---|
| १ | योगराज गुगुळ |
| २ | रस्नादी गुगुळ |
| ३ | पुनरनवा गुगुळ |
| ४ | Dashmul kwat ghanvati |
| ५ | Amrutadi gugul |
| ६ | अशोकरिष्ट |
| ७ | मेनोहेल्प सीरप |
| ८ | शतावरी टॅब्लेट |
| ९ | अशवगंधा टॅब्लेट |
| १० | V - gel |
| ११ | त्रिफळा गुगुळ |
| १२ | Cap Lucol |

Medical Superintendand CL-I
Rural Hospital, Deorukh